# देवरूखचे विधामंदिर

देवरूख हे गावच मुळी रत्नागरी जिल्हयांत उत्तम हवा पाण्यासाठी प्रसिध्द होते. दापोली हे सुध्दां त्यासाठीच प्रसिध्द होते. तिथली रमणीय शाळा एल् आकाराची. विस्तीर्ण माळावर विसावलेली. गांवापासून दूर. अतिसुंदर दृश्य शाळेतून दिसायचे. कोणत्याही वर्गाच्या दारात उभे राहिले तर दुरून दिसणारे आपल्याला खुणावणारे डोंगर मोंड माळरान. त्या जागेवर शेतीभाती काहीच नव्हती शाळेचा वेळ कसा काय संपून गेला कळलंच नाही. पहिली ते तिसरी हे इंग्लिशचे वर्ग असत. ज्याना इंग्लिश शिकायचे नसेल ते 5 वी ते 7 वी (व्हः फा ) करून मग शिक्षकाचा डिप्लोमा करत व प्रायमरी शाळांतून नौकरी धरत. 4 थी नंतर इंग्लिश पहीली दुसरी व तिसरी असे तीन वर्ग असत. जी मुले 7 वी पास होत ती एका वर्षात 3 यत्तांचा अभ्यास करून एकदम 8वीत (आतांच्या इंग्लिश चौथीत) येत. फक्त इंग्लिशच त्याना करावे लागे असे वाटते. 11 वी मॅट्रिक त्यावेळी परिक्षा कंपलसरी असे. त्यांत जे पास होतील त्यानांच परिक्षेचा फॉर्म मिळत असे. शाळेचा रिझल्ट त्यामुळे सेंटपर्सेंट लागायचा. फॉर्म भरला की शाळा संपली. मग फारच दुःख होई शाळेचे दिवस भरकन संपले ही खंत टोचत राही. शाळेत गणपति उत्सव मात्र दरवर्षी मोट्या प्रमाणात होई. त्यावेळी भाषण कविता उत्स्फूर्त भाषण वगैरेंच्या चढाओढी होत. त्यांत अर्थात् पहिल्या नबंराना बक्षिस असे. खेळांच्या चढाओढी होत. मुलीसाठी चमचा लिंबू सुई पटकन ओवणे धावणे लंगडी तीन पायानी चालणे वगैरे खेळ असायचे. मुख्य कार्यक्रम आमच्या वेळी सुरू केला तो म्हणजे नाटक. खिरापत खोबऱ्याची असे. प्रत्येक मुलीने पाळी पाळीने खोबरं (सुखे) किसायचे. ब्राह्मण पूजेला असायचा. मूर्तिची स्थापना वाजत गाजत ढोल ताशे लेझीम हयांच्यात होई. सर्व मुले मुली हजर. त्या वेळी सुटी असे. पण जर हजेरी घेतली असती तर झाडून सगळीजणें हजर असल्याचें दृश्यदिसले असते. दिवशी  विसर्जन उतमोत्तम साड्या आणून मुलीनी त्याची आरास केलेली असायची. विसर्जनाच्या वेळी सर्व आरास काढून टाकलेली भकास जागा दिसायची. खूपच रडायला यायचे. सर्व हॉल खाली असायचा. मुलीपण विसर्जनाच्या वेळी नदीवर जायच्या. विसर्जनाहून आल्यावर मी आईला विचारलेला प्रश्न मला अजून आठवतो. आपण इतकी सुंदर मूर्ति आणतो. देखावे उत्सव साजरे करतो. मग  मूर्तीचे विसर्जन कां करतो

आईचे उत्तर अग, हिंदू धर्माप्रमाणें सर्वसंगपरित्याग कल्पना आपल्यांत रुजावी दरवर्षी उत्तम मूर्ति करणारे कारागिर व्हावेत. जुन्या मूर्ति ठेवायच्या कुठें हा प्रश्न पण येणारच ना. आणी कितीही  सुंदर मोहक अशा वस्तुचा त्याग एका क्षणांत करणे हाच आपला धर्म असला पाहिजे. आईचे उत्तर आजही लागू होते. नाहीतर सत्तावन वर्षीची साथ सोडून कांही न बोलतां सांगता हे झोपेत निघून गेलेच नसते.

------------------------------------------------------------------